# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभाग नांदेड

## परिपत्रक

**विषय:-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागात **सन २०२६-२७ या द्वितीय सत्रात** शिकाऊ उमेदवारांच्या व्यवसायनिहाय ०१ (एक) वर्ष करीता नेमणुकी बाबत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागामध्ये **सन २०२६-२७ या द्वितीय सत्रासाठी** वेगवेगळया व्यवसायाकरीता **परिशिष्ट अ** मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी म्हणून ०१ (एक) वर्ष करीता ऑनलाईन पध्दतीने नेमणुक करण्यात येणार आहे. सदर बाबतीत खालीलप्रमाणे सुचना प्रसारित करण्यात येत आहेत.

१) आय. टी. आय. अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवारांनी सर्वप्रथम www.apprenticeshipindia.gov.in या वेबसाईटवर स्वतःचे रजिस्ट्रेशन केल्यानंतर **MSRTC Division Nanded** या आस्थापनेकरीता ऑनलाईन अप्लाय करणे आवश्यक आहे. जे उमेदवार सदरच्या वेबसाईटवर ऑनलाईन रजिस्ट्रेशन व अप्लाय करतील त्यांचीच शिकाऊ उमेदवारची प्रक्रीया पुर्ण करुन गुणवत्ते नुसार निवड करण्यात येईल व रा.प.महामंडळ सोबत करार **(Online Contract)** करण्यात येईल. तसेच शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड झाल्यानंतर त्यांचा प्रशिक्षण कालावधी ०१ (एक) वर्षाचा राहील.

२) ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेल्या ईच्छुक उमेदवारांना विहीत नमुन्यातील छापील अर्ज **आस्थापना शाखा, विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, असदुल्लाबाद टेकडी, रिजनल वर्कशॉप समोर, नांदेड ता.जि.नांदेड - ४३१६०५ येथे दिनांक ०८/०७/२०२६ ते दिनांक २८/०७/२०२६** रोजी पर्यंत शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस वगळून १०:०० ते १५:०० या वेळेत मिळतील व लगेच स्विकारले जातील. **दिनांक २८/०७/२०२६** रोजी वेळ १५:०० नंतर विहीत नमुन्यातील छापील अर्ज मिळणार नाहीत व स्विकारले सुध्दा जाणार नाहीत.

३) विहीत नमुन्यातील छापील **अर्जाची किंमत (GST सहीत) खुल्या प्रवर्गाकरीता रुपये ५९०/- व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र सादर केल्यास रुपये २९५/- आहे.**

४) मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी, तालुका दंडाधिकारी यांनी दिलेल्या सुधारीत नमुन्यातील जातीच्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक राहील.

५) वयोमर्यादा उमेदवाराचे वय **दिनांक २८/०७/२०२६** रोजी १५ वर्षा पेक्षा कमी व ३३ वर्षा पेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ०५ वर्ष शिथीलक्षम) तसेच एकूण जागेपैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दिव्यांग करीता शिकाऊ उमेदवार कायद्यांतर्गत जागा आरक्षीत राहतील.

६) उमेदवारांची निवड ही, त्यांचे आय.टी.आय. उत्तीर्ण होऊन मिळालेल्या एकुण प्राप्त गुणांच्या टक्केवारीच्या जेष्ठतेनुसार होईल.

७) उमेदवार अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक सत्रात खंड पडला असेल तर आय.टी.आय. उत्तीर्ण झालेल्या एकुण प्राप्त गुणांवरील टक्केवारी ग्राह्य न धरता ३५ टक्के गृहीत धरण्यात येईल.

८) शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड झालेल्या उमेदवारांची मा.जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांचे मार्फत वैद्यकीय तपासणी करुन त्यामध्ये पात्र ठरणाऱ्याच उमेदवारांचे रा.प.महामंडळाशी करार **(Online Contract)** केल्यानंतर त्यांना शिकाऊ उमेदवार म्हणुन प्रशिक्षण घेता येईल.

९) शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणकाळ संपण्यापुर्वीच उमेदवार त्याचे प्रशिक्षण सोडुन गेल्यास अथवा गैरहजर राहिल्यास उमेदवारास पाठ्य विद्यावेतनाची रक्कम किंवा अप्रेंटीस ॲडव्हायझर ठरवतील ती रक्कम नुकसान भरपाई म्हणुन भरावी लागेल. अन्यथा सदर रक्कम न भरल्यास शिकाऊ उमेदवार कायद्यानुसार त्यांचे विरुध्द कारवाई करण्यांत येईल.

१०) शिकाऊ उमेदवार म्हणून निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांचे प्रशिक्षण पुर्ण केले या आधारे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात सहायक पदामध्ये अथवा अन्य कोणत्याही पदात तात्पुरत्या अथवा कायमस्वरुपी सेवेसाठी कुठलाही आधार घेता येणार नाही. सदर शिकाऊ उमेदवार भरती बाबतचे सर्व हक्क रा.प.महामंडळाकडे अबाधित राहतील.

जाक्र/राप/विनि/नांदे/आस्था/भरती/२०२६/१२००
विभाग नियंत्रक, यांचे कार्यालय, रा.प.नांदेड
दिनांक :- ०७/०७/२०२६

(अभय प्र. देशमुख)
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन,नांदेड

# परिशिष्ट (अ)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागातील **सन २०२६-२७ या द्वितीय सत्रात** शिकाऊ उमेदवारांच्या व्यवसायनिहाय ०१ (एक) वर्ष करीता भरावयाच्या जागेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचा व्यवसाय | जागा | पाठ्यवेतन रुपये | शैक्षणिक पात्रता व इतर अटी |
|---|---|---|---|---|
| ०१ | मेकॅनिक मोटार व्हेईकल | ४० | १४,६६६/- | शासनमान्य आय.टी.आय. मेकॅनिक मोटार व्हेईकल या व्यवसायातील दोन वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक |
| ०२ | मेकॅनिक डिझेल | ४४ | १३,०३७/- | शासनमान्य आय.टी.आय. मेकॅनिक डिझेल या व्यवसायातील एक वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक |
| ०३ | शिट मेटल वर्क्स | ०८ | १३,०३७/- | शासनमान्य आय.टी.आय. शिट मेटल वर्क्स या व्यवसायातील एक वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक |
| ०४ | ॲटो इलेक्ट्रीशियन | ०५ | १३,०३७/- | शासनमान्य आय.टी.आय. ॲटो इलेक्ट्रीशियन या व्यवसायातील दोन वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक |
| ०५ | वेल्डर (गॅस ॲन्ड इलेक्ट्रीक) | ०६ | १३,०३७/- | शासनमान्य आय.टी.आय. वेल्डर (गॅस ॲन्ड इलेक्ट्रीक) या व्यवसायातील एक वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक |
| ०६ | मेकॅनिक रेफ्रिजरेशन ॲन्ड एअर कंडीशनर | ०२ | १४,६६६/- | शासनमान्य आय.टी.आय. मेकॅनिक रेफ्रिजरेशन ॲन्ड एअर कंडीशनर या व्यवसायातील दोन वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक |
| ०७ | पेन्टर (जनरल) | ०३ | १४,६६६/- | शासनमान्य आय.टी.आय. पेन्टर (जनरल) या व्यवसायातील दोन वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक |
| ०८ | टर्नर | ०२ | १४,६६६/- | शासनमान्य आय.टी.आय. टर्नर या व्यवसायातील दोन वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक |

- वयोमर्यादा उमेदवाराचे वय **दिनांक २८/०७/२०२६** रोजी १५ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ०५ वर्षे शिथीलक्षम)

(अभय प्र. देशमुख)
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन, नांदेड